# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

जा.क्र.कबचौउमवि/१६/व्याख्यान/हस्तदेय/२०१९ दि.१८ ऑक्टोबर,२०१९

**बातमी क्र.१**

जळगाव दि.१८ ( ) बदलती जीवनशैली स्त्रीयांमध्ये असलेली सहनशीलता आणि आजाराकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती यामुळे स्त्रीयांमध्ये कर्करोगाचे प्रमाणे वाढत असून वेळीच चिकित्सा करुन घ्यावी असे आवाहन डॉ.श्रध्दा चांडक यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर महिलांच्या मनस्विनी ग्रुपच्या वतीने 'कॅन्सर विषयक माहिती, त्याबाबत जागृती तसेच कॅन्सर होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी' या विषयावर प्रसिद्ध कॅन्सरतज्ज्ञ डॉ. निलेश चांडक व डॉ.श्रध्दा चांडक यांचे शुक्रवारी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, समन्वयक डॉ. मधुलिका सोनवणे उपस्थित होते.

डॉ. श्रध्दा चांडक म्हणाल्या की, स्त्रीयांमध्ये प्रामुख्याने गर्भाशयाचा आणि स्तनाचा कर्करोग आढळून येतो. गतवर्षी स्तनाचा कर्करोग असलेले १ लाख ७५ हजार नवीन रुग्ण आढळून आले यामध्ये ८० हजार स्त्रीयांचा मृत्यू झाला. स्थुलपणा, जीवनशैली, लवकर आलेली मासिकपाळी, गर्भधारणेला झालेला उशिर, वंध्यत्व अशी काही कारणे कर्करोगाला कारणीभूत आहेत. काही लक्षणे आढळल्यास तातडीने चिकित्सकाकडून तपासणी करुन घेणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी अनेक उदाहरणे दिली. डॉ. निलेश चांडक यांनी देखील कर्करोगाविषयी सविस्तर माहिती देऊन शंकाचे निरसन केले.

प्रा.माहूलीकर यांनी यावेळी बोलतांना कर्करोगाचे निदान झाल्यानंतर मानसिकता ढासळू न देता कणखरपणे सामोरे जावे कारण विज्ञानाने प्रगती केल्यामुळे उपचाराच्या अत्याधुनिक पध्दती आल्या आहेत. डॉक्टरांनी देखील कर्करोगाचे आव्हान स्वीकारले आहे. असे ते म्हणाले. प्रारंभी प्रा.मधुलिका सोनवणे यांनी प्रास्ताविक केले. करुणा भटकर, अनुराधा परदेशी व वैशाली शर्मा यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सुत्रसंचालन वैशाली वराडे यांनी केले. भारती भावसार यांनी आभार मानले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/व्याख्यान/हस्तदेय/२०१९ दि.१८ ऑक्टोबर,२०१९

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१८ (          ) जीवनात उच्च ध्येय जरुर बाळगा मात्र आपला दृष्टीकोन आणि योग्यता सकारात्मक असावी याकडे अधिक लक्ष द्यावे असे आवाहन पार्थसारथी मिश्रा (आय.ए.एस.,ओरिसा) यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेतर्फे आयोजित युवक आणि सत्य या विषयावर व्याख्यान देतांना श्री.मिश्रा बोलत होते. संचालक प्रा.अनिल डोंगरे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मिश्रा यांनी बायोडाटा, रेझ्युम, करिक्युलम यातील फरक स्पष्ट केला. मोठ्या पॅकेजचे आकर्षण बाळगून परदेशात न जाता देशातील विकासात योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रा. रमेश सरदार यांनी सुत्रसंचालन केले. डॉ.पवित्रा पाटील यांनी आभार मानले.

---

**जा.क्र.कबचौउमवि/१६/व्याख्यान/हस्तदेय/२०१९ दि.१८ ऑक्टोबर,२०१९**

प्रति,
मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी